# महाराष्ट्राच्या सन २०१० - २०११ च्या सहकारावर दृष्टीक्षेप

महाराष्ट्र राज्यातील सहकार चळवळ ही अग्रगण्य चळवळ म्हणून भारतात अग्रक्रमावर आहे. जनतेचा पुढाकार व सरकारच्या सुलभ पध्दती, एकगतीने करण्याचा सकारात्मक प्रयत्न करणे ही सरकारची भुमिका असणे आवश्यक आहे. लोकांना एकत्रित करून त्यांचेकडून भाग - भांडवल उभारून व ठेवी स्विकारून आर्थिक व सामाजिक कार्य एकत्रितरित्या करण्यासाठी **सहकार** हे एकमेव माध्यम असून, यामुळे लोकांच्या उत्पन्नात वाढ होऊन रोजगाराची निर्मिती होत असते. या सहकार चळवळीमुळे कृषी, दुग्ध, मत्सव्यवसाय, कृषी प्रक्रिया, साठवणूक, विक्री, पणन, पतपुरवठा व बँकिंग, गृहनिर्माण, सेवा, औद्योगिक इत्यादी क्षेत्रात लक्षणीय प्रगती जनतेच्या सहभागामुळेच झालेली आहे.

महाराष्ट्र राज्यात ३१ मार्च २०१० अखेर **दोन लाख १८ हजार सहकारी संस्था** नोंदणीकृत असून त्यांची सभासद संख्या ही **५ कोटी ३९ लाख आहे.** या एकूण सहकारी संस्थांपैकी **९.८ टक्के कृषी पतपुरवठा, १०.९ टक्के बिगरकृषी पतपुरवठा व उर्वरीत ७९.३ टक्के पणन, उत्पादन,उपसा जलसिंचन, विद्युत पुरवठा, पाणी पुरवठा, वाहतुक, सामाजिक** इत्यादी क्षेत्रात संस्था कार्यरत आहेत.

## महाराष्ट्र राज्यातील सहकारी संस्थांची महत्वाची वैशिष्ठे :-

| बाब | १९६०-६१ | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २००८-०९ | २००९-१० * |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **१. सहकारी संस्थांची संख्या** | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | ३९ | २९ | ३१ | ३४ | ३४ | ३५ | ३४ |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था $ | २१,४०० | २०,४२० | १८,५७७ | १९,५६५ | २०,५५१ | २१,२७५ | २१,३९२ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | १,६३० | २,९६४ | ५,४७४ | ११,२९१ | २२,०१४ | २४,१६७ | २३,८३९ |
| (४) पणन संस्था | ३४४ | ४१० | ४२३ | ९३१ | १,११५ | १,७१२ | १,७५४ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम @ | ४,३०६ | ६,८१० | १४,३२७ | २८,९५४ | ३९,०७० | ४६,७४४ | ४७,९५३ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था @ | ३,८४६ | ११,९६४ | २१,९१५ | ४३,८४५ | ७५,२३२ | १,१८,४०१ | १,२३,३४८ |
| एकूण | **३१,५६५** | **४२,५९७** | **६०,७४७** | **१,०४,६२०** | **१,५८,०१६** | **२,१२,३४४** | **२,१८,३२०** |
| **२. सभासदांची संख्या (०००')** | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था $$ | ७६ | ७० | १,०१४ | १,४८५ | १,३७१ | २९९ | २४१ |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | २,१७० | ३,७९४ | ५,४१६ | ७,९४२ | १०,१२५ | १४,८०६ | १४,९२३ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | १,०८७ | २,४३८ | ३,७५९ | ९,३०२ | १८,४६७ | २२,२७६ | २३,९१२ |
| (४) पणन संस्था | १४१ | २८२ | ४७१ | ७४५ | ८४० | १,३२० | १,८५१ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम | ३२३ | ९५९ | २,१२४ | ३,९७४ | ६,३३९ | ६,७६७ | ६,६४८ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | ३९४ | १,०३८ | १,९९९ | ३,४५५ | ५,८८० | ६,३३१ | ६,३९५ |
| एकूण | **४,१९१** | **८,५८१** | **१४,७८३** | **२६,९०३** | **४३,०२२** | **५१,७२९** | **५३,९७०** |

| बाब | १९६०-६१ | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २००८-०९ | २००९-१० * |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **३. खेळते भांडवल (रु. कोटी)** | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | ११९ | ६१३ | १,८३१ | ८,८०६ | ३९,२६७ | ७९,२११ | ५८,०५८ |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | ५८ | ३४३ | ५२७ | १,८५१ | ६,९८८ | १४,५२६ | १५,१४७ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | ४६ | १६८ | १,२०९ | ७,५०८ | ६६,८८७ | १,१४,३२९ | १,३१,३०७ |
| (४) पणन संस्था | ६ | ३९ | १८८ | ३४० | १,५१८ | ३,४२९ | ६,३८३ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम | ४१ | २१९ | १,०२९ | ४,५८८ | १३,२८८ | १६,०७१ | १८,८९९ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | २१ | १०७ | ४२६ | १,१९१ | ६,४९२ | ९,००५ | ९,११५ |
| एकूण | **२९१** | **१,४८९** | **५,२१०** | **२४,२८४** | **१,३४,४४०** | **२,३६,५७१** | **२,३८,९०९** |
| **४. स्थूल कर्ज (रु. कोटी)** | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | १७५ | ७५१ | १,५२८ | ९,०८५ | २८,७०९ | २४,७०० | २८,२५९ |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | ४३ | १३३ | २५० | ८०० | ३,७३४ | ५,२८६ | ४,३८४ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | ४७ | २०४ | १,१२९ | ५,१७८ | ३९,२६८ | ५२,१९४ | ५२,२१९ |
| (४) पणन संस्था | ३ | ३ | ३ | ८ | १८ | १० | १५ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम | १ | ३ | १२ | १७ | १०३ | १७९ | ३१२ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | १ | ४ | १२ | ६० | २३५ | १८७ | १७२ |
| **एकूण** | **२७०** | **१,०९८** | **२,९३४** | **१५,१४८** | **७२,०६७** | **८२,५५६** | **८५,३६१** |
| **५. येणे कर्जे (रु. कोटी)** | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | ८७ | ४७८ | १,१३७ | ५,८८९ | २३,१२० | ३२,७३८ | ३४,३९१ |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | ४८ | २८४ | ३८४ | १,३१० | ५,३०८ | १०,२९८ | ९,१०८ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | ३२ | १०५ | ७३१ | ४,५९४ | ३५,९०८ | ४८,७२६ | ३७,०२४ |
| (४) पणन संस्था | १ | २ | ४ | ९ | १८२ | १४४ | ११७ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम | १ | ६ | ३० | ६९ | २३६ | २४९ | २९७ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | २ | ८ | २५ | १९१ | २,८९९ | ८०९ | ७५२ |
| **एकूण** | **१७१** | **८८३** | **२,३९१** | **१२,०६२** | **६७,६५३** | **९२,९३४** | **८१,६८९** |
| **६. उलाढाल-तयार मालाच्या विक्रीचे मूल्य (रु. कोटी)** | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | ला.ना. | ला.ना. | ला.ना | ला.ना. | ला.ना. | ला.ना. | ला.ना. |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | १० | ५१ | १४६ | २३९ | १,०१२ | ४१४ | ३८६ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | २ | ३ | १० | .... | ३८ | ४९ | ११२ |
| (४) पणन संस्था | ४८ | २१४ | ९७९ | २,६०२ | ३,२०५ | १,३७३ | १,७९४ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम | ३६ | १९४ | १,०३१ | ३,४६७ | ७,४९६ | ७,९९९ | १०,९२९ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | ११ | ६९ | १८७ | ३३० | १,५८८ | २,९५७ | ३,५२६ |
| **एकूण** | **१०७** | **५३१** | **२,३५३** | **६,६३८** | **१३,३३९** | **१२,७९२** | **१६,७४७** |

| | | |
|---|---|---|
| आधार | - | सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन |
| टीप | - | १९९०-९१ पर्यंतची आकडेवारी जून अखेरपर्यंतची आहे. |
| * | - | अस्थायी |
| $ | - | यात प्राथमिक कृषि पतसंस्था, प्राथमिक भू विकास बँका आणि धान्य बँका यांचा १९७०-७१ पर्यंत समावेश आहे. |
| $$ | - | नाममात्र सभासद वगळून |
| @ | - | २०००-०१ या वर्षापासून उपसा सिंचन संस्थांचा समावेश उत्पादक ऐवजी सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था या प्रकारात करण्यात आला आहे. |
| ला.ना. | - | लागू नाही. |

महाराष्ट्र राज्यातील सहकारी संस्थांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे. :-

**राज्यातील सहकारी संस्थांचा तपशील**

( रु. कोटी)

| तपशील | ३१ मार्च रोजी २००९ | ३१ मार्च रोजी २०१०* | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| संस्था (संख्या) | २,१२,३४४ | २,१८,३२० | २.८ |
| सभासद (लाख) | ५१७ | ५३९ | ४.४ |
| भरणा भाग भांडवल | १४,९६९ | १७,१२९ | १४.४ |
| या पैकी, राज्य शासनाचे | २,१७८ | २,४३९ | १२.० |
| खेळते भांडवल | २,३६,५७१ | २,३८,९०९ | १.३ |
| ठेवी | १,१८,०२४ | १,२७,६३० | ८.१ |
| स्थूल कर्ज | ८२,५५६ | ८५,६२८ | ३.४ |
| निव्वळ कर्ज | ५७,४८१ | ५६,६०४ | (-) १.५ |
| तोटयातील संस्था (संख्या) | ५९,१२६ | ६२,९२४ | ६.४ |
| तोटयाची रक्कम | ५,६८७ | ६,३३६ | ४७ |
| येणे कर्जे | ९२,९३५ | ८१,६८९ | (-) १२.१ |

आधार : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

वरील सर्व आकडेवारीवरून **सहकाराचे महत्व शासनाची भुमिका व सहकारातील कार्यकर्त्यांचे कर्तृत्व** निश्चितपणे लक्षात येईल. बिगर कृषी पतसंस्था म्हणजे नागरी / ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था व पगारदार कर्मचाऱ्यांच्या सहकारी पतसंस्था होय. अशा पतसंस्थांची सन **२००९ - २०१० अखेर संख्या २३८३९** असून त्यामधील सभासदांची संख्या २ कोटी ३९ लाखांच्यावर आहे. पतसंस्थांचे **खेळते भांडवल हे १ लाख ३१ हजार कोटींच्यावर** गेले आहे. पैकी त्यातील एकूण **येणे कर्ज रूपये ३७ हजार कोटींच्यावर** आहे. ह्यावरून महाराष्ट्र

राज्यातील सहकारी पतसंस्थांची हि चळवळ किती महत्वाची आहे हे सरकार, लोकप्रतिनिधी व सहकारातील अनेक कार्यकर्त्यांना व मान्यवरांना अद्याप पुरेसे समजून घेता आले नाही, ही दुर्दैवाची बाब आहे. त्यामुळे घटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मुळ संकल्पनेला तिलांजली देण्याचे काम वारंवार पतसंस्थांच्या बाबतीमध्ये झालेले आहे. केंद्र व राज्य सरकारने सहकारी साखर कारखाने, सहकारी सुत गिरण्या, प्रक्रिया सहकारी संस्था इत्यादींना ज्या सोयी, सवलती, कमी व्याज दराने कर्ज पुरवठा, आर्थिक मदत, पॅकेजेस,मुक्त हस्ते ह्याच कारखान्यांचा प्रसार व प्रचार ज्या पध्दतीने आजपर्यंत केला, त्या पध्दतीने मात्र शासनाने पतसंस्थांना काहीही दिलेले नाही. त्यातील काही महत्वाच्या व आवश्यक गोष्टी सरकारने त्वरीत अमलात आणणे आवश्यक आहे.....

## - पतसंस्थांसाठी सरकारने पुढाकार घेवून करावयाच्या गोष्टी -

१. बँकांप्रमाणे सहकारी पतसंस्थांसाठी डिपॉझीट गॅरंटी कारर्पोरेशनची स्थापना करणे.

२. बँकांप्रमाणे सहकारी पतसंस्थांना लेखापरिक्षण शुल्क लागू करणे.

३. विशेष वसुली व विक्री अधिकारी यांच्याबद्दलच्या कायद्यातील तरतुदीमध्ये बदल करून शिक्षण व पदामध्ये शिथिलता आणणे.

४. सहकारी साखर कारखाने, सहकारी सुतगिरण्या, प्रक्रिया संस्था इत्यादींना केंद्र सरकारने नाबार्डच्या माध्यमातून महाराष्ट्र शासनाने पुढाकार घेवून ज्या पध्दतीने विविध पॅकेजेस दिली, थकबाकीदारांची कर्जे माफ करून त्यांची भरपाई शासनाने दिली, त्याच पध्दतीवर पतसंस्थांच्या थकबाकीसंदर्भात कार्यवाही करणे.

५. थकबाकी वसुल करणेसाठी कलम १०१ व कलम ९१ खाली मिळालेले दाखले अंमलबजावणीसाठी मागताक्षणी पोलिस संरक्षण देणे.

६. विशेष वसुली व विक्री अधिकाऱ्याने राजमुद्रेचा करावयाच्या वापरासंबंधी योग्य ती कायदेशीर तरतूद करणे.

७. कलम १०१ द्वारे प्राप्त झालेल्या कर्जवसुली दाखल्यावर कुठल्याही परिस्थीतीत वसुली दाखल्याच्या ५० टक्के रक्कम भरल्याशिवाय अपिल न स्विकारण्याबाबत तरतुद करणे.

८. अपसेट प्राईजला मान्यता देण्यासंदर्भात १५ दिवसांत निकाल करणे.

९. विशेष वसुली व विक्री अधिकारी यांचे चार्जेस शासनाला वर्ग करण्याच्या ऐवजी पतसंस्थांनाच वर्ग करणेबाबत. इत्यादी.

वरीलप्रमाणे ह्या अत्यंत अग्रहक्काने पतसंस्थांच्या पुर्ण करावयाच्या समस्या आहेत. वरील बाबींसाठी अत्यल्प आर्थिक उपलब्धता व बजेटमधील तरतूद ही नगण्य स्वरूपाची असून, शासनाने यासाठी त्वरीत पुढाकार घेणे आवश्यक आहे. **हे राज्य सर्वांसाठी आहे**.जनतेकडुन वसुल केलेल्या कराच्या रकमेचा विनियोग हा सर्व पातळीवर समान पध्दतीने करून न्यायदानाची सुध्दा भुमिका व कार्यवाही समानतेवरच आधारीत असावयास हवी. कारण राज्यातील पतसंस्थांचा आवाका हा, इतर बँका, साखर कारखाने, सुत गिरण्या यांच्यापेक्षा किती तरी जास्त आहे, हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**